

## श्री रामदास स्वामी यांनी रचलेले मारुती स्तोत्र, सुलभ मराठी अर्थासहित.

**भीमरूपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती । वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ||१||**

प्रचंड मोठा, रुद्राचा अवतार, इंद्राने फेकेलेले वज्र ज्याच्या हनुवटीला लागले असा मरुताचा, वायू (वनारि-वनातील झाडांचा शत्रू, पवन) व अंजनी यांचा पुत्र, रामाचा दूत. झंझावातासारखा (प्रभंजन).

टीप- येथे 'वानरी' असाही पाठभेद दिसतो, परंतु तो माझ्या मते तितकासा योग्य नाही. मारुतीला वायुसुत व अंजनीसुत अशी दोन्ही नावे आहेत.

**महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळें । सौख्यकारी दुःखहारी, दूत वैष्णव गायका ||२||**

अत्यंत ताकदवान, (संजीवनी मुळी आणून लक्ष्मणाला) जीवनदान देणारा, सर्वांना बळपूर्वक उठवणारा, सर्वांना सुखदायक, दुःख हरण करणारा, विष्णूचा अवतार रामाचे स्तुती गान करणारा

टीप- येथे देशातील तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा संदर्भ असू शकतो. महाराष्ट्रात सर्वत्र मारुतीची मंदिरे उभारण्याचा समर्थांचा उद्देश समाज जागृती व बलोपासना हाच होता.

**दीननाथा हरीरूपा, सुंदरा जगदंतरा | पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना ||३||**

दीन दुबळ्यांचा आधार, (रामरूपी) विष्णू (हरी) चे रूप असणारा, (इहलोकी व) परलोकीही सौष्ठवपूर्ण शरीरयष्टी असलेला, पाताळातील राक्षसांचा (अहिरावण महीरावण) वध करणारा, सर्वांगाला शेंदुराचा लेप दिलेला

**लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना । पुण्यवंता पुण्यशीळा, पावना परितोषका ||४||**

जगताचा पालक, प्राचीन चिरंतन असलेला, पुण्यवान पावन चरित्र असणारा आनंददायक

**ध्वजांगे उचली, बाहो, आवेशें लोटला पुढें । काळाग्नी काळरुद्राग्नी, देखतां कांपती भयें ||५||**

ध्वजस्तंभासारखे हात उचलून आवेशाने पुढे झेपावणारा, व त्याची ही रौद्र स्थिती पाहून यम, काळरूपी भयंकर अग्नीही थरथर कापतात

टीप- येथे मारुती महाभारत युद्धात अर्जुनाच्या ध्वजावर बसला होता व रथ वेगाने पुढे नेण्यात त्याचा हातभार होता या कथेचाही संदर्भ असू शकेल.

**ब्रह्मांडे माईली नेणों, आंवळे दंतपंगती | नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळें ||६||**

जेव्हा तो आवेशाने दात ओठ खातो त्यावेळी जणू त्याच्या मुखात सर्व ब्रह्मांडच सामावले जाते, त्याच्या डोळ्यातून आगीचे झोत बाहेर पडतात व भुवया ताणल्या जातात

**पुच्छ ते मुरडीले, माथा किरीटी, कुंडले बरीं। सुवर्ण कटी कांसोटी, घंटा किंकिणी नागरा ||७||**

त्याने आपली शेपूट गुंडाळून घेतली आहे, डोक्यावर मुकुट आणि कानात सुंदर कुंडले घातली आहेत. कमरेला सोनेरी रंगाचे वस्त्र नेसले आहे, व त्याच्या कडदो-याला बांधलेल्या घंटांचा मधुर आवाज येतो

**ठकारे पर्वता ऐसा, नेटका सडपातळू । चपळांग पाहतां मोठे, महाविद्युल्लतेपरी ||८||**

मारुती पर्वतासारखा उभा ठाकतो, त्याचे शरीर सडपातळ आहे. त्याचे भव्य शरीर विजेच्या लोळाप्रमाणे चपळ आहे.

**कोटिच्या कोटि उड्डाणें, झेपावे उत्तरेकडे । मंद्राद्रीसारिखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें ||९||**

खूप मोठे उड्डाण करून तो उत्तर दिशेकडे झेपावला. मंदार पर्वतासारखाच प्रचंड मोठा द्रोण पर्वत त्याने रागाने उपटून काढला.

**आणिला मागुतीं नेला, आला गेला मनोगती | मनासी टाकिलें मागें, गतीसी तुळणा नसे ||१०||**

त्याने तो पर्वत आणला व परतही नेला. मनाच्या वेगाने तो आला आणि परत गेला. त्या वेगात त्याने मनाच्या वेगालाही मागे टाकले. त्या वेगाची कशाशीही तुलना होऊ शकत नाही.

**अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे । तयासी तुळणा कोठे, मेरु मंदार धाकुटे ||११||**

छोट्याश्या अणूपासून तो ब्रह्मांडा एवढा मोठा झाला. त्याच्याशी मेरु, मंदार अशा महान पर्वातांचीही तुलना होऊ शकत नाही.

टीप- समुद्रावरून लंकेकडे उडत असताना मारुतीला सुरसा राक्षसीने गिळण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मारुतीने प्रचंड तसेच अत्यंत लहान रूप धारण करून स्वतःची सटका करून घेतली.या गोष्टीचा संदर्भ `अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा' ला आहे.

**ब्रह्मांडाभोवते वेढे, वज्रपुच्छे करू शके । तयासी तुळणा कैंची, ब्रह्मांडी पाहता नसे ||१२||**

तो संपूर्ण विश्वाला आपल्या शेपटाने विळखा घालू शकतो. या विश्वात त्याच्याशी कोणाचीच तुलना होऊ शकत नाही.

टीप- मारुतीच्या शेपटातही खूप ताकद आहे. राम रावण युद्धात मारुतीने आपल्या शेपटाच्या विळख्यात गुंडाळून हजारो राक्षसांना ठार मारले या गोष्टीशी या श्लोकाचा संदर्भ असावा.

**आरक्त देखिलें डोळा, ग्रासिले सूर्यमंडळा | वाढतां वाढता वाढे, भेदिले शून्यमंडळा ||१३||**

(जन्मतःच) त्याने लालभडक सूर्यबिंब पाहिले आणि त्याला गिळून टाकण्यासाठी उड्डाण केले. (त्यासाठी त्याने) आपला आकार वाढवत वाढवत (गोल आकार असलेले) सर्व विश्व भेदून टाकले. (सर्व विश्व भेदून तो सूर्यापर्यंत गेला.)

**धनधान्य पशूवृद्धि, पुत्रपौत्र समग्रही | पावती रूपविद्यादी, स्तोत्रपाठें करूनियां ||१४||**

है स्तोत्र म्हटल्याने पैसा. धान्य, (गाई, बैल, घोडे इ.) जनावरे, मुले-नातवंडे, सुंदर रूप, ज्ञान इ. मिळतात.

**भूतप्रेतसमंधादी, रोगव्याधी समस्तही । नासती तुटती चिंता, आनंदे भीमदर्शनें ||१५||**

मारुती (भीम) दर्शन घेतल्याने आनंद होतो व भूत, प्रेत, समंध, सर्व रोग, व्याधी नाश पावतात, काळज्या नाहीशा होतात. (बलोपासनेने शरीर व मन सुदृढ होऊन कोणत्याही चिंता मनाला वेढत नाहीत.)

**हे धरा पंधरा श्लोकी, लाभली शोभली बरी । दृढदेहो निसंदेहो, संख्या चन्द्रकळा गुणें ।।१६।।**

संख्येने चंद्राच्या कलां इतके (प्रतिपदा ते पौर्णिमा) असलेले हे पंधरा श्लोक लाभल्याने ही पृथ्वी छान शोभिवंत झाली. (या स्तोत्र पठनाने) निश्चितच मजबूत शरीर यष्टी प्राप्त होईल.

**रामदासी अग्रगण्यू, कपिकुळासि मंडणू । रामरूपी अंतरात्मा, दर्शनें दोष नासती ।।१७।।**

जो श्रीरामाच्या सेवकांमध्ये सर्वात पुढे (सर्वश्रेष्ठ) आहे, वानर कुळाला भूषणास्पद आहे, ज्याचे अंतर्मन पूर्णपणे राममय झालेले आहे, त्या मारुतीच्या दर्शनाने सर्व प्रकारचे दोष नाहीसे होतात.

॥ इति श्रीरामदासकृतं संकटनिरसनं मारुतिस्तोत्रं संपूर्णम् ॥

असे हे श्री रामदास स्वामींनी रचलेले मारुती स्तोत्र संपले.

************************

धनंजय बोरकर (९८३३०७७०९१ / 9307754318)

: stotramanjusha
www.stotramanjusha.com